नादुरुस्त विद्युत रोहित्रे तात्काळ बदलण्यासाठी निरंतर वीज योजनेस मार्च २०२९ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/ प्र.क्र.२६६/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२६.

<u>संदर्भ:</u>- १. क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३१६/ऊर्जा-५ दि. ०५ मार्च, २०२४
२. कार्यकारी संचालक (वितरण), महावितरण कंपनी मर्या.,यांचे पत्र क्र.११०७३,दि.३०.०३.२०२६

<u>प्रस्तावना</u> :-

महावितरण कंपनी राज्यातील ३.१६ कोटी ग्राहकांना वीज वितरण प्रणालीमार्फत वीजपुरवठा करते, त्यामध्ये ४५ लाख शेतीपंप ग्राहकांचा समावेश आहे. वीज वितरण प्रणाली मध्ये उपकेंद्रे, विविध वाहिन्या आणि विद्युत रोहित्रे यांचा समावेश होतो. ग्राहकांना अखंडित, नियमित आणि दर्जेदार विद्युत पुरवठा करण्यासाठी वितरण प्रणाली सुस्थितीत व सक्षम राहण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आणि त्याची निगा राखणे जरुरीचे असते. शासनाच्या विविध योजनांमध्ये विद्युत मागणीतील वाढीनुसार नवीन उपकेंद्रे, वाहिन्या व नवीन रोहित्रांचा वितरण प्रणालीमध्ये समावेश करण्यात येतो. यामध्ये विद्युत रोहित्रे व त्यावरील भार तसेच त्यांची भौतिक परिस्थिती यांचा महत्वाचा भाग आहे.

२. ग्राहकांना अखंडीत व योग्य भाराने वीज पुरवठा होण्यासाठी रोहित्रे सुस्थितीत असणे महत्वाचे आहे. रोहित्रे वारंवार बिघाड होण्याचे प्रमाण वाढले तर शेती व बिगरशेती ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत होतो किंवा ग्राहकांना विद्युत पुरवठा अनियमितपणे होतो. लोक प्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या विविध बैठका, भेटी दरम्यान ग्राहकांची रोहित्रे जळण्याबद्दलच्या विविध तक्रारी मांडल्या जातात. त्यामुळे शासनाची व महावितरण कंपनीची प्रतिमा जनमानसात मलीन होते. विद्युत रोहित्रे नादुरूस्त असल्यामुळे शेतकऱ्यांना पाणी असूनही योग्य वेळेत पिकांना सिंचन करणे शक्य होत नाही, घरगुती ग्राहकांना अंधारात राहावे लागते, वीज वापरावर अवलंबून असलेली विविध दैनंदिन कामे खोळंबली जातात, त्यामुळे त्या भागातील जनजीवन विस्कळीत होते.

३. या सर्व विषयाचा सारासार विचार करुन विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा आणि रोहित्रे जळण्याचे प्रमाण कमी व्हावे या हेतुने मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांनी अर्थसंकल्पिय अधिवेशन २०२३-२४ मध्ये नादुरुस्त विद्युत रोहित्र तात्काळ बदलण्यासाठी योजना जाहिर केली. त्याअनुषंगाने शा.नि.दि. ०५.०३.२०२४ नुसार निरंतर वीज योजना मंजुर करण्यात आली. राज्यासाठी १५ वर्षे पूर्वीपासूनची रोहित्रे बदलणे आणि रोहित्रातील ऑईल बदलणे याकरिता सन २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षाकरिता एकूण रु. १५०० कोटी सहाय्यक अनुदान मंजुर करण्यात आले.

४. सद्यस्थितीत महावितरणकडे ९,२५,३६३ विद्युत रोहित्रे असून त्यापैकी ३१५ केव्हीए पर्यंत क्षमतेची ६,३९,०९२ विद्युत रोहित्रे आहेत, त्यावरुन विविध शेती आणि बिगरशेती ग्राहकांना विद्युत पुरवठा केला जातो. त्यांची क्षेत्रीय कार्यालयांकडून वेळोवेळी प्रतिबंधात्मक देखभाल केली जाते.

५. <u>रोहित्रे नादुरुस्त होण्याची कारणे:-</u>

रोहित्रावरील अतिभारीत विद्युतभार, पावसाळ्यात वीज पडणे,वारंवार दुरुस्ती करुन अंतर्गत वायरिंगची क्षमता कमी होणे व रोहित्रे जळणे व विद्युत रोहित्रातील ऑईलचे प्रमाण कमी होणे या प्रमुख कारणांमुळे रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण वाढते.

६. <u>रोहित्रे दुरुस्तीची सध्याची कार्यपध्दती:-</u>

रोहित्रांची अंतर्गत वायरिंग नादुरुस्त झाल्यानंतर Rewinding करुन विद्युत रोहित्रे दुरुस्ती करुन पुन्हा बसविली जातात आणि विद्युत पुरवठा सुरळीत केला जातो.

७. <u>१५ वर्ष व त्यापेक्षा जास्त वयोमान असलेली सध्या कार्यरत रोहित्रे:-</u>

प्रस्तावानुसार सद्यस्थितीत महावितरण कंपनीमध्ये कार्यरत असलेली <u>१५ वर्ष व त्यापेक्षा जास्त वयोमान असलेली रोहित्रे</u>:-

	एकूण कार्यरत		१५ वर्षावरील	
क्षमता	११ के.व्ही	२२ के.व्ही	११ के.व्ही	२२ के.व्ही
६३	२२५९९८	१४६५९	३३८०८	२१६१
१००	२९०१९३	२८५९३	४०९२२	३६०६
२००	५१०९३	१२७३८	७२६४	१३६१
३१५	८०८९	७७२९	१७५०	१०४१
	५७५३७३	६३७१९	८३७४४	८१६९

८. <u>रोहित्रे बदलण्याचे व रोहित्रातील ऑईल बदलण्याचे वर्षनिहाय नियोजन व किंमत:-</u>

रोहित्र जळण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि नादुरुस्त रोहित्रे तात्काळ बदलण्यासाठी कमीत कमी १५ वर्षापूर्वीपासूनची विद्युत रोहित्रे बदलणे आणि काही जुन्या विद्युत रोहित्रातील जुने झालेले ऑईल बदलणे तसेच ऑईलची पातळी योग्य करणे आवश्यक आहे.

अ) १५ वर्षापूर्वी पासूनची रोहित्रे बदलण्यासाठी ३ वर्षाचा कालावधी व रु.१२३७ कोटी खर्च अपेक्षित आहे. या योजनेमध्ये निरंतरपणे दरवर्षी रोहित्रे टप्प्याटप्प्याने बदलणे प्रस्तावित आहे. तीन वर्षामध्ये (सन २०२६-२९) १५ वर्षापासूनची कार्यरत असलेली ३० % रोहित्रे बदलण्याचे प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार महावितरणमधील ३१५ केव्हीए पर्यंतची विविध क्षमतेची विद्युत रोहित्रे बदलण्याचे वर्षानिहाय नियोजन आणि त्याची बदलण्याची अंदाजित किंमत पुढीलप्रमाणे आहे:-

क्षमता (के.व्ही.ए.)	एकूण ३ वर्ष		सन २०२६-२७		सन २०२७-२८		सन २०२८-२९	
	११/२२ के.व्ही. रोहित्रे संख्या	खर्च (रु.कोटी)	११/२२ के.व्ही. रोहित्रे संख्या	खर्च (रु.कोटी)	११/२२ के.व्ही. रोहित्रे संख्या	खर्च (रु.कोटी)	११/२२ के.व्ही. रोहित्रे संख्या	खर्च (रु.कोटी)
१००	२४१५०	९२०.०७	८०५०	३०६.६९	८०५०	३०६.६९	८०५०	३०६.६९
२००	२५८६	१८४.३५	८६२	६१.४५	८६२	६१.४५	८६२	६१.४५
३१५	८३७	१३२.५७	२७९	४४.१९	२७९	४४.१९	२७९	४४.१९
	२७५७३	**१२३६.९९**	**९१९१**	**४१२.३३**	**९१९१**	**४१२.३३**	**९१९१**	**४१२.३३**

ब) रोहित्रांमधील ऑईलची पातळी योग्य करण्याकरिता तसेच नादुरुस्त रोहित्रांमधील नवीन ऑईल बदलणे याकरिता ३ वर्षांचा कालावधीत रु.२७३ कोटी खर्च अपेक्षित आहे.

रोहित्रांमधील ऑईल (कि.ली) बदलणे व त्याबाबतचा अंदाजित खर्च:-

क्षमता (के.व्ही.ए.)	एकूण ३ वर्ष		सन २०२६-२७		सन २०२७-२८		सन २०२८-२९	
	ऑईल (कि.ली)	खर्च (रु.कोटी)	ऑईल (कि.ली)	खर्च (रु.कोटी)	ऑईल (कि.ली)	खर्च (रु.कोटी)	ऑईल (कि.ली)	खर्च (रु.कोटी)
६३	८४३१.८९	७७.३१	२८०८.६३	२५.७७	२८०८.६३	२५.७७	२८०८.६३	२५.७७
१००	१३६९२.४८	१२५.६१	४५६४.१६	४१.८७	४५६४.१६	४१.८७	४५६४.१६	४१.८७
२००	५८०२.०३	५३.२२	१९३४.०१	१७.७४	१९३४.०१	१७.७४	१९३४.०१	१७.७४
३१५	१८६६.७२	१७.१३	६२२.२४	५.७१	६२२.२४	५.७१	६२२.२४	५.७१
	२९७८७.१२	**२७३.२७**	**९९२९.०४**	**९१.०९**	**९९२९.०४**	**९१.०९**	**९९२९.०४**	**९१.०९**

९. सदर योजनेची मुदत ३१ मार्च, २०२६ रोजी संपुष्टात आली असून सदर योजनेचे फायदे लक्षात घेता निरंतर वीज योजनेस मार्च, २०२९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

विद्युत रोहित्रे (Transformers) नादुरुस्त असल्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना पाणी असूनही योग्य वेळेत पिकांना संरक्षित सिंचन मिळत नाही. परिणामी उत्पन्नात घट होते. नादुरुस्त रोहित्रे तात्काळ बदलण्यासाठी निरंतर वीज योजनेस मुदतवाढ देण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

अ) ग्राहकांना अखंडीत आणि दर्जेदार वीजपुरवठा देण्याकरिता १५ वर्षापूर्वी वितरण प्रणालीमध्ये असलेले जुने विद्युत रोहित्रे बदलण्यास व त्याकरिता विद्युत रोहित्रांचे ऑईल

बदलण्यासाठी निरंतर वीज योजनेस मार्च २०२९, पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

आ) दर्जेदार वीजपुरवठा देण्याकरिता १५ वर्षापूर्वी वितरण प्रणालीमध्ये असलेले जुने विद्युत रोहित्रे बदलण्यास व त्याकरिता लागणारा खर्च एकूण रु.१२३७ कोटीस, त्यापैकी सन २०२६-२७ मध्ये रु.४१२.३३ कोटी सन २०२७-२८ मध्ये रु.४१२.३३ कोटी आणि सन २०२८-२९ मध्ये रु.४१२.३३ कोटी अशा खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

इ) विद्युत रोहित्रांचे ऑईल बदलणे आणि पूर्ण क्षमतेएवढी पातळी करण्याकरिता लागणारा खर्च एकूण रु.२७३.२७ कोटीस, त्यापैकी सन २०२६-२७ मध्ये रु.९१.०९ कोटी सन २०२७-२८ मध्ये रु.९१.०९ कोटी आणि सन २०२८-२९ मध्ये रु.९१.०९ कोटी अशा खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

ई) राज्यासाठी १५ वर्षापूर्वीपासूनची रोहित्रे बदलणे आणि रोहित्रातील ऑईल बदलणे याकरिता ३ वर्षासाठी एकूण रु.१५१० कोटी इतका खर्च (००)(०२) महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित यांस सहायक अनुदान (कार्यक्रम) ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) लेखाशिर्ष क्र.२८०१२६२४ मधील तरतुदीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. <u>योजनेची उद्दिष्टे:-</u>

१) वारंवार रोहित्रे जळल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होऊन ग्राहकांची होणारी गैरसोय थांबविणे.

२) विश्वसनीय विद्युत पुरवठा देणे.

३) नवीन विद्युत रोहित्रे जास्त कार्यक्षमतेची Operational वापरल्यामुळे खर्च कमी करणे.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत वीजपुरवठा उपलब्ध व्हावा या दृष्टीकोनातून सुधारीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० दि.०८.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार १००% कृषी वीज वाहिन्या सौर ऊर्जेवर आणण्यासाठी सुमारे १६००० मे.वॅ. विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे.

निरंतर वीज योजनेमध्ये नवीन विद्युत रोहित्रे बसविल्याने या योजनेसाठी पुढील फायदे होतील:-

१) नवीन विद्युत रोहित्रांमुळे तांत्रिक हानी कमी होण्यास मदत होईल.

२) व्होल्टेज प्रोफाईल सुधारण्यास मदत होईल व त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार वीज पुरवठा मिळेल.

३) तांत्रिक हानी कमी झाल्यामुळे वीजेची मागणी कमी होण्यास मदत होईल.

३. <u>योजनेची अंमलबजावणीची पध्दती:-</u>

१) या योजनेमध्ये रोहित्रांची कार्यान्वित होण्याच्या तारखेनुसार आणि क्षमतेनुसार यादी महावितरण कंपनीच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातून काढण्यात येईल.

२) त्यानुसार प्रथम वर्षामध्ये (सन २०२६-२७) मंडळनिहाय १५ वर्ष व त्यापेक्षा जास्त वर्षापासून कार्यरत असलेली रोहित्रे यांची संख्या निर्धारीत करुन त्या जागी नवीन विद्युत रोहित्रे बसविण्यासाठी निविदा प्रक्रीया राबवून नवीन रोहित्रे खरेदी करण्यात येतील.

३) १५ वर्षे व त्यापूर्वीची रोहित्रे Scrap करण्यात येतील. त्या जागी नवीन रोहित्रे बसविण्यात येतील.

४) रोहित्रांसाठी नवीन ऑईल, नादुरुस्त रोहित्रे Top up करण्याकरीता व जुन्या रोहित्रांमध्ये ऑईलची पातळी योग्य करण्याकरीता वापरण्यात येईल.

५) दर तीन महिन्यांनी योजनेअंतर्गत रोहित्रे नवीन खरेदी व बदलण्याचा प्रगती अहवाल महावितरणकडून शासनास सादर करण्यात येईल.

ही योजना सन २०२६-२७, सन २०२७-२८ आणि सन २०२८-२९ या वर्षांमध्ये १५ वर्षांपासूनची रोहित्रे व त्यासाठी रोहित्रांमधील ऑईल बदलण्यासाठी निरंतरपणे राबविण्यात येईल.

४. **<u>लेखाशिर्ष:-</u>**

या योजनेवर होणारा खर्च (००)(०२) महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित यांस सहायक अनुदान (कार्यक्रम) ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) (लेखाशिर्ष क्र.२८०१२६२४) या लेखाशिर्षामधून भागविण्यात येईल.

५. **<u>योजनेचा कालावधी :-</u>**

ही योजना सन २०२६-२७, सन २०२७-२८ आणि सन २०२८-२९ या वर्षांमध्ये १५ वर्षावरील वयोमान झालेली रोहित्रे व त्यासाठी रोहित्रांमधील ऑईल बदलण्यासाठी निरंतरपणे राबविण्यात येईल. निरंतर योजना राबविण्यासाठी राज्यशासनावर आर्थिक भार रु.१५१० कोटी येणार आहे.

६. नादुरुस्त विद्युत रोहित्रे तात्काळ बदलण्यासाठी निरंतर वीज ही योजना राबविल्यामुळे शाश्वत विकास ध्येये क्र.०७ चे लक्ष्य क्र.७ (ब) सन २०३० पर्यंत साध्य करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

७. आवश्यकता असल्यास महावितरण कंपनीने या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रमाणित कार्यपध्दती (SoP) तयार करावी.

८. सदर योजना शासन निर्णयानुसार राबविण्याची जबाबदारी सर्वस्वी महावितरण कंपनीची आहे. या निर्णयानुसार महावितरण कंपनीने तात्काळ अंमलबजावणी सुरु करुन शासनास दर २ महिन्यांनी अहवाल सादर करावा.

९. सदर शासन निर्णय मा.मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०८०३१६२६११३१५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SURYAKANT KISAN NIKAM
Date: 2026.08.03 16:27:18 +05'30'

(सुर्यकांत निकम)
शासनाचे सहसचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा/सभापती/उप सभापती विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई -३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मुंबई -३२.

५. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मुंबई -३२.
६. मा. मंत्री (अपारंपारिक ऊर्जा), मंत्रालय, मुंबई -३२.
७. मा. राज्यमंत्री (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई -३२.
८. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
९. सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
१०.मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११.अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१२.अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४.सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१५.सचिव,महाराष्ट्र वीज नियामक आयोग,कफ परेड,मुंबई.
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१७. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१८.कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१९.निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०.ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.